सर्वे: सन्तु निरामया:

रेकि ब्रह्म

वर्ष ९वे अंक १ला । ऑक्टोबर २०२०

सुख शांती आरोग्याची, आस सायोज्यमुक्तीची ।
सर्व इच्छा पुरविसी, जय देवी रेकि माते ॥

संपादकिय

‘डोळे’

हे आत्म्याच्या खिडक्या आणि मनाचे दरवाजे..

रेकि शिबिरामध्ये सुरूवातीलाच योगनिद्रेचे सत्र घेताना मला हे म्हणायला खूप आवडते आणि ते म्हणजे “तुमचे डोळे किती सुंदर आहेत. सुंदर आहेत कारण ते आत्म्याच्या खिडक्या आहेत. त्यातूनच आत्मा जीवनाचे अनुभव घेत असतो.” खरेच, आपले डोळे हे आत्म्याच्या खिडक्या आहेत. त्यामुळेच केवळ डोळे पाहून माणसाचा अभ्यास करता येतो. असे म्हणतात कि डोळ्यांवाटे माणसाची परीक्षा होत असते. माणूस सात्विक आहे का तामसिक, लबाड आहे का चांगला हे डोळ्यांवरून कळू शकते. असेही म्हणतात कि डोळे कधीच फसवू शकत नाहीत. आणि म्हणूनच एखादा गुन्हेगार डोळ्यांना डोळे भिडवून बोलू शकत नाही.

अशाच शिबिरांमध्ये ध्यानसत्रे घेताना आम्ही हेही म्हणतो कि डोळे बंद ठेवा, सगळे लक्ष श्वासावर केंद्रित करा इत्यादि. ध्यानाला डोळे बंद ठेवणे निदान प्राथमिक अवस्थेत तरी आवश्यक असते. साधकाची ऊर्जा पातळी जशी वाढते तसे तो उघडया डोळ्यांनीही ध्यान करण्याच्या पात्रतेचा होतो. डोळे बंद का ठेवायचे तर माणसाचे मन डोळ्यांवाटे भन्नाट भटकते. डोळे उघडे असले कि मन त्या डोळ्यांच्या वाटे इथे–तिथे भटकायला सुरूवात करते एखाद्या माकडासारखे. मग ते एखाद्या गोष्टीकडे पाहत भूतकाळात घुसते किंवा वर्तमानातच धक्काबुक्की करत राहते किंवा आकाशातील ढगाला लोंबकळून भविष्याच्या स्वप्ननगरीचा फेरफटका मारून येते. कधी इथे तर कधी तिथे..

खरे पाहता, मनाला अनुभवांसाठी बरीच द्वारे देवाने दिली आहेत. त्यातूनच जर त्याने येण्या–जाण्याचा प्रघात ठेवला तर त्या अंदाधुंद मनाला थोडी शिस्त तर येईल. परंतु शांतपणे, निर्लेपपणे आयुष्याचे अनुभव घेणाऱ्या आत्म्याला शांति मिळू नये असा विडाच जणू ह्या चंचल मनाने घेतलेला असतो. जसे एखादे निवृत्त आजोबा खिडकीपाशी बसून निळेभोर आकाशाला पाहून त्याच्याशी, किंवा दूरवरच्या एखाद्या हिरव्यागार झाडाशी गप्पा मारत रंगात आले आहेत किंवा आकाशातून अगदी शिस्तित एका रांगेने चाललेल्या बगळ्यांच्या माळेकडे कौतुकाने पाहत आहेत, तेव्हाच नेमके घरातल्या एखाद्या व्रात्य पोराने खिडकीतून उडया मारत बाहेर जावे आणि काही काळाने पुन्हा राजमार्गाचा दरवाजा सोडून त्याच खिडकीतून येऊन आजोबांच्या डोक्या–खांद्यावरून उडी मारून घरात शिरावे तसेच काहीसे. एव्हाना त्या शांतिपूर्ण आजोबांची शांति आता ढळलेलीच असते. मग शांतपणे खिडकी बंद करून नातवंडांचा त्रास टाळणारे आजोबा निसर्गाचे अवलोकन करण्याच्या आपल्या आवडत्या छंदापासून वंचित राहत आहेत याची जाणच ह्या व्रात्य पोरटयांना कळत नाही तसेच काहीसे नाते ह्या आत्म्याचे आणि मनाचे. आत्मा शांत तर मन उसळणारे, आत्मा तृप्त तर मन प्रत्येक क्षणाला काहीतरी मिळवण्याच्या हव्यासामागे. आत्मा अध्यात्माचे स्वरूप तर मन व्यवहाराचे.

पण ज्या माणसांनी सिद्ध स्वरूप प्राप्त केले आहे त्यांना ह्या माकड उडयांचा काहीच त्रास होत नाही. एखादे खटयाळ मूल खिडकीतून बाहेर गेले हेच ज्याला समजत नाही किंवा ते परत येऊन आडदांडपणा करत आहे हेही ज्याला समजले नाही त्याला कसला त्रास? परंतु ती अवस्था प्राप्त होईपर्यंत तरी साधकाने आपल्या मनाला दरवाजे वापरायची संवय करायला हवी. दरवाजे असताना खिडक्यांतून आवक जावक हवीच कशाला? एवढी सुज्ञता आली तर डोळ्यांमधली चमक आयुष्यभर पुरेल. मग व्यावहारीक जीवन जगताना सुद्धा साधना करणे हा एक आनंदाचा अनुभव असेल.

जय गुरूदेव

अजित सर

दि. १५ सप्टेंबर २०२०

साधना आणि उपासना

चंद्रेश परमार, वडोदरा.

खुप दिवसांपासून एक विचार मनात सतत डोकावत होता. कर्मकांड किती काळ करावं? घरात पण कधी कधी मला सांगितल जात होत की तुम्ही कर्मकांडात रमले आहात. पण मला कळत नव्हतं की कर्मकांड का सोडायचं? तो तर साधकाचा पुढे जाण्याचा मार्ग आहे. स्वत:ची आणि घराची सकारात्मक उर्जा वाढवण्याचा पर्यायच आहे. पण काल 'गुरुचरित्राचे सार' या ऑनलाईन कार्यक्रमात एका साधकाच्या प्रश्नाला जे उत्तर गुरुजींनी दिले त्यात मला माझ्याही प्रश्नाचे उत्तर मिळाले.

"साधना आणि उपासना ह्या मध्ये फरक काय?" असा प्रश्न होता. गुरुजींनी सांगितले की, "उपासना ही साधनेचा छोटा अंश आहे. साधनेची सुरुवात उपासनेने होते. उपासना म्हणजे कर्मकांड, ज्यात देवाची पुजा–अर्चा, यज्ञ–याग, शिवलींगाची पूजा, दूधाचा अभिषेक, उपास करणे वगैरे असते." गुरुजी पुढे म्हणाले, "साधना ही उपासनेच्या खूप पुढची पायरी आहे. पण उपासनेशिवाय साधना शक्य नाही. उपासना म्हणजे रन–वे आहे. उडण्यासाठी रन–वेचा उपयोग करावाच लागतो. गुगल वर तुम्ही एखादे स्थळ शोधू शकता पण त्यानंतर जेव्हा प्रत्यक्ष त्या स्थळाला भेट देण्यासाठी प्रवास करता, तेव्हा त्या दोन्ही वेळचे अनुभव वेगळे असतात. गुगल मॅप वरून प्रेरणा घेऊन योग्य मार्गावर प्रवास करणे हीच साधना आहे."

योग्य वेळ आल्यावर साधकाने उपासना किंवा कर्मकांडाशिवाय पुढचा प्रवास करायला हवा. हे सगळं सोडायला हवं. जेव्हा सर्व सुटते तीच साधना. गुरुजी सांगतात की, कुठल्याही कर्मकांडात गुंतू नये. आता प्रश्न आहे की आपल्याला कसे कळेल की आता कर्मकांड सोडून पुढे जाण्याची वेळ आली आहे? ह्या प्रश्नाचे उत्तरही गुरुजींनी छान समजावले. "आपण लहान असताना आई–वडिलांबरोबर बाहेर फिरायला जायचो तेव्हा खेळण्यांचे दूकान पाहून खेळणी घेण्याची इच्छा आपल्याला व्हायची. हळूहळू मोठे झाल्यावर आपल्याला त्या खेळण्यांचे कुतुहल वाटत नाही. आता आपण मोठे झाले आहोत ह्याची जाणीव होते. आता मला खेळण्यापेक्षा मैदानी खेळ खेळले पाहीजेत, कार्टुन बघणे सोडून सामाजिक मालिका किंवा बातम्या बघायला हव्या असे वाटू लागते. लहान मुली पूर्वी प्लास्टीकच्या छोटया भांडयांनी घरघर खेळत असतात पण जसजसे वय वाढत जाते तसे आईला स्वयंपाक करण्यात मदत करू लागतात. त्यांना जाणीव होते की आता खोटया भांडयांशी खेळण्यापेक्षा खरी भांडी आवरायला हवी. असाच अंतरमनातील आवाज असतो जो सांगेल की आता कर्मकांड सोडायला हवे त्याची गरज उरली नाही. आणि तेव्हाच खऱ्या साधनेची सुरुवात होते."

ह्यासाठी बाहेरची कोणी व्यक्ती तुम्हाला हे समजावू शकत नाही. एकतर गुरु आहेत जे तुम्हाला काय सोडायचे आणि काय सुरु करायचे ह्याची प्रेरणा देतात आणि दुसरे म्हणजे 'ध्यान'. ध्यान नियमीत केल्याने पण ही स्थिती समजते की आपण किती पुढे गेलो आहोत अथवा उपासनेच्या पुढे पाऊल ठेवायची वेळ आली आहे.

पुढे प्रश्न हा आहे की मग खरोखर उपासना किंवा कर्मकांड बंद करायला हवे का? तर त्याचे मला समजले ते उत्तर असे की दुसऱ्यांना हा मार्ग दाखवण्यासाठी किंवा शिकवण्यासाठी आपल्याला कर्मकांड केले पाहीजे, पण त्यात गुंतता कामा नये. म्हणजे ते सोडल्याने साधकाला दु:ख किंवा पश्चाताप होऊ नये. जर सुटले तर ईश्वरेच्छा मानायला हवी.

उदा. अग्निहोत्र कर्मकांड आहे. प्रत्येक साधकासाठी महत्वाचे साधन आहे. कारण त्यापासून निसर्गाला फायदा होतो. बऱ्याच आजारांवर अग्निहोत्राच्या भस्माचा उपयोग होतो. जर तुम्ही साधनेसाठी उपासनेपासून दूर जाऊन अग्निहोत्र करणे सोडून दिले तर दुसऱ्या उपासकाला वाटेल की आपण पण अग्निहोत्र का करायचे? ज्याने आपल्याला शिकवले आहे, ज्याने प्रेरणा दिली आहे तो स्वत: अग्निहोत्र करत नाही. पण तुम्ही अग्निहोत्र का सोडले हे नवा साधक समजू शकत नाही, म्हणून तुम्हाला अग्निहोत्र करणे जरूरीचे आहे. पण अग्निहोत्र न केल्याने तुम्ही बैचेन होत असाल, त्याची वेळ साधण्यासाठी जीवाच रान करत असाल, काहीही असो अग्निहोत्र केलेच पाहिजे असे वाटत असेल तेव्हा समजावे की तुम्ही अजून कर्मकांडातच रममाण आहात.

आणि दुसरे म्हणजे, बऱ्याच जणांना असे वाटते की कर्मकांडाला काहीच अर्थच नाही, साधनाच करायला हवी तर ती व्यक्ती उपासक आणि साधक होऊ शकत नाही. हे तर असे झाले की एखादा विद्यार्थी पहिली–दूसरी इयत्ता शिकल्याशिवाय सरळ दहावीची किंवा बारावीची परिक्षा देत आहे.

माझ्यामते सर्वात महत्वाचे आहे की रेकि ही सर्वोत्तम साधना आहे.

अमृतधारा

समाधानी साधक

वामनसूत

नाही पुंण्याची मोजणी
नाही पापाची टोचणी ।

सुखी समाधानी मी देवा
तूची दिला आरोग्याचा ठेवा ।

संसारही होय नेटका,
तुझीच लिला कृपाळुवा ।

मुखी नाही शब्द खोटा
प्रामाणिक त्याच धरील्या वाटा ।

इतरांचा न कधी हेवा
नाही कारण कोणा उपद्रवा ।

वैर न धरिले संघर्ष टाळला
दोन पाऊल मागे राखून स्वबळा ।

नीती नियम मार्ग बरवा
सारून दूर लोभ लाभ वा ।

जागलो कर्म कर्तव्या
विनये जोडली समाजसेवा ।

जाणिले जव ईश्वरा तुला
आलो शरण अन्य नाही भावा ।

सांभाळीलेस मज तू देवा
आशिर्वाद आणिक काय हवा ।

दिस गोड व्हावा दिस गोड व्हावा
वर समाधानाचा सकळांस द्यावा ।

(भाग ३५वा)

तेलंग स्वामी

एक अद्भुत अस्तित्व

अनुवादक – सौ. शुभदा गर्गे, नाशिक

दुसऱ्या दिवशी आश्रमात जाऊन स्वामीजींनी स्थापन केलेल्या महादेव व कालीमातेचे दर्शन करून स्वामीजींना नमस्कार करुन ते एका कोपऱ्यात जाऊन बसले.

काही वेळाने तेलंग स्वामी उमाचरणजींना घेऊन एका छोटया खोलीत गेले. जाताना मंगलदासांना कोणाला आत न सोडण्यास सांगितले. खोलीत एक आसन घातलेले होते व दिवा प्रज्वलित होता. स्वामीजी आसनावर बसले व उमाचरणजींना शेजारी बसवून घेतले.

स्वामीजी हळू आवाजात बोलू लागले, तुला जे विचारायचे आहे ते विचारण्यात संकोच कसला? त्रिकालदर्शी, आत्मज्ञानी महर्षि, देवर्षि, सिध्द महात्मे या सर्वांनी आपल्या तपोबळाने व योगबळाने ह्या गोष्टीचा निर्णय घेतला आहे, त्यावर शंका घेणे बरे नव्हे. या सर्वांनी जे काही सांगितले आहे ते फक्त आणि फक्त सत्य आहे. प्रत्येक जीवाला आपल्या चांगल्या–वाईट कर्मानुसार सुख–दु:ख भोगायला वारंवार जन्म घ्यावा लागतो हे खरे आहे. चिंतन करून व प्रयत्न करून मानव पूर्वजन्म, आताचा जन्म व पुढचा जन्म ह्या तीन्ही जन्मातील संस्कारांबद्दल जाणून घेऊ शकतो. पण कोणी तसा प्रयत्नच करीत नाही. मी तुला जे काही सांगेन ते खरे कशावरून? आणि तू त्यावर विश्वास का ठेवायचा. आता तू एवढे कष्ट करून माझ्या समीप आला आहेस तर मी तुला तुझ्या पुनर्जन्माबद्दल समजावतो व दाखवतोही. सर्वात आधी मी अशा घटना सांगेन ज्याबद्दल तुझ्याशिवाय कोणालाही काही माहीत नाही. त्या सर्व जर खऱ्या निघाल्या तर त्या घटनांबद्दल सांगेन ज्या पुढे घडणार आहेत. जेव्हा एखाद्या व्यक्तीचा पुनर्जन्म होतो तो वर्तमानातल्या माल–मसाल्यासह होतो – म्हणजेच जीवात्मा व परमात्मा ह्यांच्या संयोगातूनच होतो व म्हणून ह्या जन्मी जो विद्वान आहे तो पुढच्या जन्मी पण विद्वानच असेल. ह्या जन्मी धार्मिक असेल तर पुढच्या जन्मी धार्मिक असेल. या जन्मी चोर असेल तर पुढच्या जन्मी साव नाही होऊ शकत. थोडा विचार केल्यावर लक्षात येईल की असे नसते तर परमेश्वराला सर्व शक्तीमान व दयाळु म्हटले नसते. उलट सर्वांनी म्हटले असते परमेश्वराइतका अन्याय तर पापी माणसेही करत नाही.

जर एकच फक्त वर्तमान जन्म असता तर कोणीच राजा, रंक, प्रजा, मालक, नोकर, धनी, गरीब, चपरासी, भंगी, रोगी नसते. कोणी खूप श्रीमंत तर कोणाला एकवेळ खायला नाही – एवढी विसंगती का? कोणालाच काही विपरीत न करता शिक्षा भोगावी लागत नाही. देव चांगल्या – वाईटाचा विचार करीत नाही का? आपल्या इच्छेप्रमाणे मनमानी करतो का? कधीच नाही. कर्मानुसार हा फरक असतो. आपला देह म्हणजे वर्ण, विद्या, बुध्दी, स्वभाव व कर्मफल हे सर्व मिळून तयार होणारी आकृती आहे. म्हणून प्रत्येक माणूस वेगळा व प्रत्येकाची सुख–दु:खही वेगवेगळी. जसे आरशातले प्रतिबिंब बिंबावर अवलंबून असते तसेच सरळ मार्गाने चालणाऱ्याला आत्ता जी तुझी अवस्था आहे तशी अवस्था प्राप्त होते. दुसऱ्यावर अन्याय केल्यास अथवा वाईट कर्म केल्यास नीच जन्म प्राप्त होतो तर सत्कर्म व धर्म चर्चा केल्यास आत्म्याची उन्नति होऊन उत्तरावस्था प्राप्त होते. तू चोरी केलीस तर तुला शिक्षा मिळेल. तू तसे नाही केलेस तर कोणाची हिम्मत होणार नाही तुला शिक्षा द्यायची. जसे आजार झाल्यावर डॉक्टर व औषधाची गरज असते तसेच आजार आजार नसल्यास या दोन्हींची आवश्यकता नसते. आता तू विचार कर तू कोणत्या वंशात जन्म घेतला आहेस? तुझा स्वभाव कसा आहे? या जन्मात जे चांगले वाईट कर्म केलेस ते तू जाणतोस. पूर्वजन्मीच्या चांगल्या कर्मामुळे तुझा ब्राम्हण कुळात जन्म झाला. आता ब्राम्हणाला उचित असे कर्म केल्यास आत्मोन्नति होईल. पापाचार केलास तर चांडाळाच्या घरात जन्म घेशील. या बाबतीत कोणालाही काही विचारण्याची गरज नाही. मी नंतर समजावून सांगेन.

उमाचरणजींना मध्ये काही बोलायची संधी मिळाली नाही. ते विचार करीत होते की स्वामीजींना त्यांच्या मनातले सर्वकाही कसे समजले असेल ! खरचं स्वामीजी सर्वज्ञ आहेत. ते जे काही सांगतील ते सर्व काही सत्यच असेल. माझ्याकरता त्यांना त्रास सहन करावा लागला, हे लक्षात नाही आले.

स्वामीजी पुढे सांगू लागले, "तुझे नाव अमुक आहे, तुझ्या वडिलांचे नाव अमुक आहे, तुझे घर अमुक गावी आहे, तुझ्या घरात इतक्या खोल्या आहेत, घराच्या अमुक दिशेला तलाव आहे. त्याच्या जवळ अमुक झाड आहे व तुझ्या घरात हे लोक राहतात." स्वामीजींनी सारे काही अशा पध्दतीने सांगितले जसे काही ते स्वत: तिथे जाऊन आले आहेत. उमाचरणजी अवाक होऊन ऐकत होते. स्वामीजी सांगू लागले, "पूर्वजन्मी तू एक ब्राम्हण होतास. अमक्या गावात, अमुक नावाने एक ख्यातनाम जमीनदार होतास. खूप शिष्ट होतास. दुसऱ्या मजल्यावरच्या दक्षिणेकडील दरवाज्यावर तू तीन संस्कृत श्लोक लिहिले होतेस, जे अजुनही तसेच आहेत. शक्य झाले तर जाऊन बघून ये."

मग स्वामीजी पुन्हा सांगू लागले, "अमुक एका गावात एक अमुक नावाची व्यक्ति आहे, जी तुझ्यावर खूप प्रेम करते. तू पण त्या व्यक्तिवर खूप प्रेम करतोस. कारण माहित आहे? ते पूर्वजन्मी तुझे वडील होते. पिता–पुत्राचे पूर्वजन्मीचे प्रेम अजुनही कायम आहे, शरीरे बदलली असल्याने तुम्ही एकमेकांना ओळखू शकत नाही. तुझे काका मुंगेर गावातच राहतात. त्यांचा पण तू खूप लाडका आहेस. ते रोज ९–१० वाजेपर्यंत तुझ्याजवळच असतात. दिवसातून एकदा तरी तुझे दर्शन झाल्याशिवाय त्यांना चैन पडत नाही. तुला पण त्यांच्याबद्दल माया वाटते. पूर्वजन्मीचे स्नेहबंध तसेच राहिले फक्त शरीर बदलले.

शेवटी स्वामीजी म्हणाले, "ह्या गोष्टी सांगायची गरज नव्हती, फक्त तुझ्या मनात कुठल्याही प्रकारचा संदेह राहू नये व तुझा विश्वास बसावा म्हणून सांगावे लागले. पूर्वजन्मीच्या सत्कृत्यामुळे तुझा जन्म ब्राम्हण कुळात झाला. आता काशीला आला आहेस तर असे कर्म कर की जन्मोजन्मीचे भोग नाहीसे होतील. सत्कृत्य करीत राहीलास तर मुक्ति मिळेल. वासनेचा त्याग हाच मुक्तिचा सर्वश्रेष्ठ मार्ग आहे."

बोलता बोलता रात्र संपली. पहाटे स्वामीजी म्हणाले, "घरी जाऊन आन्हिके उरकून लवकरात लवकर परत ये, आज आपण एकत्रच गंगा–स्नान करू. येताना एक वही घेऊन ये. तुला काही उपदेश करीन, तो लिहून ठेव. पुढे तुला त्याचा फायदा होईल. ऐकून सर्व काही लक्षात राहीलच असे नाही. हे वाचल्यावर धर्मशास्त्रांवरची पुस्तके वाचायची गरज भासणार नाही. मुक्तिशिवाय मानवाला गति नाही. सदैव मुक्तिचीच इच्छा करीत राहा. जोपर्यंत ज्ञानाचा प्रकाश पडत नाही तोपर्यंत जन्म–मृत्यूच्या अंध:कारमय फेऱ्यातून सुटका नाही.

क्रमशः

रेकि युवा साधक उर्जा हीचे आत्मनिर्भर भारत अभियानातील योगदान

आपली एक रेकि युवा साधक उर्जा पंडया हीने, तिच्या दोन सहकार्यांसोबत आत्मनिर्भर भारत अभियानाला वेग देण्यासाठी 'डेमबॉय' नावाच्या, स्वदेशी थ्रीडी प्रिन्टर बनवण्याच्या उद्योगास सुरवात केली आहे. अभीयंत्याची पदवी प्राप्त केलेल्या उर्जा पंडया हीने तिच्या दोन सहकार्यांसोबत स्वदेशी तंत्रज्ञानाचा आणि सामग्रीचा उपयोग करुन शाळा आणि टिंकरींग प्रयोगशाळेला उपयुक्त अशा स्वदेशी थ्रीडी प्रिन्टर चे निर्माण लॉकडाउनच्या काळात केले आहे. प्रशासनाद्वारे जाहीर केलेल्या अनलॉकच्या काळापर्यंत युवा अभियंत्यांच्या 'Start up'ला ५०हुन अधिक ऑर्डर मिळाल्या आहेत.

"सामान्यातली सामान्य व्यक्ती आणि शाळेत शिकणारे विद्यार्थी पण ह्या 'डेमबॉय'चा उपयोग करुन त्याद्वारे नविन प्रॉडक्टस आणि प्रोटोटाइपचे निर्माण करु शकतील. विद्यार्थ्याना प्रॉजेक्ट डिझाइन आणि थ्रीडी प्रिन्टर ची मुलभूत माहिती देण्यासाठी गरजेचे असणारे सॉफ्टवेअर टुल्स पण 'डेमबॉय' बरोबर त्यांना देण्यात येतील. आमच्या ह्या प्रयत्नाद्वारे प्रॉडक्ट डिझायनिंग क्षेत्रात उपयोगी असलेल्या थ्रीडी प्रिन्टर मशिनरी, तसेच ऑटोमेशन टुल्सला स्वदेशात विकसीत करण्याच्या दिशेने हे पहिले पाऊल आहे." असे उर्जा पंडया हीने येथे नमुद केले.

શહેરના ત્રણ યુવાનોએ આત્મનિર્ભરક ભારત અભિયાનને વેગ આપવા થ્રીડી પ્રિન્ટર વિકસાવ્યું

(પ્રતિનિધિ) વડોદરા,તા.૮

વડોદરાના ત્રણ યુવાઓ દ્વારા આત્મનિર્ભર ભારત અભિયાનને વેગ આપવા માટે 'ડેમબોય' નામના સ્વદેશી થ્રીડી પ્રિન્ટર બનાવવા અંગે ના સ્ટાર્ટઅપ વેંચરની શરૂઆત કરવામાં આવી છે. એન્જિનિયરિંગ ગ્રેજ્યુએટ એવા મૈત્રેય કુલકર્ણી, ઊર્જા પંડયા તથા સોહન જાવલે દ્વારા સ્વદેશી ટેક્નિકલ અને મટીરીયલનો ઉપયોગ કરીને શાળા તેમજ ટિંકરિંગ લેબ્સમા ઉપયોગમાં લઈ શકાય તેવા સ્વદેશી થ્રીડી પ્રિન્ટરનું નિર્માણ લોકડાઉનના સમયમાં કરવામાં આવ્યું હતું. સરકાર દ્વારા જાહેર કરવામાં આવેલ અનલોકના સમય સુધીમાં તો યુવા ગ્રેજ્યુએટ્સના સ્ટાર્ટઅપ પ્રોડક્ટ્સ ને લગભગ પચાસ કરતાં વધુ ઓર્ડર મળી ચૂક્યા છે, તેઓની ઉદ્યોગસાહસિકતા ની આ સફરમાં તેઓને વડોદરા ની જાણીતી મેન્યુફેક્ચરીંગ કંપની 'એન્જિનિયરિંગ ટેક્નિક' નો ખાસ સહયોગ મળ્યો હતો. વિનામૂલ્યે આપવામાં આવેલ આ સપોર્ટ અંતર્ગત તેઓએ ઇન્ડસ્ટ્રી સ્ટાન્ડર્ડને ધ્યાનમાં રાખીને ગુણવત્તાયુક્ત, ટકાઉ તથા કોમ્પેક્ટ એવા નાના મશીનની રેન્જ ખૂબ જ ટૂંકા સમયમાં વિકસિત કરી શક્યા હતા. તેઓને સ્ટાર્ટઅપ માર્ગદર્શન અંગેનો જરૂરી સપોર્ટ પારુલ યુનિવર્સિટીના 'વડોદરા સ્ટાર્ટઅપ સ્ટુડિયો' ખાતેથી પણ મળેલ છે. સામાન્યમાં સામાન્ય માણસ તેમજ શાળામાં અભ્યાસ કરતા વિદ્યાર્થીઓ પણ યુવાઓ ના આ સ્ટાર્ટઅપ દ્વારા બનાવેલ 'ડેમબોય' ને વપરાશમાં લઇ શકે છે તથા તેના દ્વારા અવનવી પ્રોડક્ટ તથા પ્રોટોટાઇપ વિકસિત કરી શકે છે. વિદ્યાર્થીઓને પ્રોજેક્ટ ડિઝાઇન અને થ્રીડી પ્રિન્ટર અંગેની પ્રાથમિક સમજ આપવા માટે જરૂરી એવા સોફ્ટવેર ટુલ્સ પણ 'ડેમબોય' સાથે વિદ્યાર્થીઓને મળી રહેશે. આ અંગે વધુ જણાવતા મૈત્રેય કહે છે કે, અમારો આ પ્રયાસ પ્રોડક્ટ ડિઝાઇનિંગ ક્ષેત્રે ઉપયોગમાં લેવાતા થ્રીડી પ્રિન્ટર મશીનરી, મશીનરી તેમજ ઓટોમેશન ટૂલ ને સ્વદેશમાં જ વિકસિત કરવા તરફનું પહેલું પગલું છે, આગામી દિવસોમાં અમે અમારા આ સ્ટાર્ટઅપ વેન્ચર અંતર્ગત આવા સમાજ ઉપયોગી પ્રોડક્ટ બનાવતા રહીશું.

ડેમબોય થ્રીડી પ્રિન્ટરની ખાસિયતો

૧. સ્વદેશી બનાવટ
૨. સરળ ઓપરેટિંગ મિકેનિઝમ
૩. આકર્ષક ડિઝાઇન સાથે ઓછું વજન ધરાવતું
૪. ઓછું ખર્ચાળ

उर्जाच्या या कामगिरीबद्दल तीचे रेकि परिवारातर्फे हार्दिक अभिनंदन आणि तिच्या भविष्यातील योजनांसाठी खूप खूप शुभेच्छा !

अहंकाराचा प्रभाव

खूप वर्षांपूर्वी कनकपूर नावाचे एक राज्य होते. त्याचा सम्राट होता वीरसिंह. वीरसिंह एक आदर्श राजा होता. तो आपल्या प्रजेची खूप काळजी घ्यायचा. अतिशय दक्ष, प्रेमळ आणि आपल्या कर्तव्याला जागणारा हा सम्राट साऱ्या जगाच्या कौतुकाला प्राप्त होता. आपल्या राज्यातील लोकांना सदैव आशिर्वाद मिळावेत म्हणून तो मोठमोठया साधू–संतांना आपल्या राज्यात सन्मानाने बोलावून त्यांचा सत्कार करायचा. एक दिवस त्याच्या कानावर आले कि एक महानुभव सेवानंद अध्यात्मातील एक अतिशय उच्च कोटीचा फकीर असून त्याचे नाव जगाच्या कानाकोपऱ्यात दुमदुमत आहे. चौकशी करता त्याच्या लक्षात आले कि मुळात हा फकीर आपल्याच राज्यातील असून तो आता परदेशी निवासाला असतो. तो साधारण त्याच्याच वयाचा असून तो त्याच्याच शाळेत शिकत असे. विचार करता त्या सम्राटाला हेही आठवले कि त्याकाळी त्याचे नाव मणिराम होते व ह्या दोघांमध्ये दाट गट्टी होती. दोघेही एकाच बाकावर बसून शिकायचे. त्याला आपल्या शाळासोबतीच्या उन्नतिचा अभिमान वाटला. आपल्या बाळपणीच्या मित्राला भेटायला सम्राट आतुर झाला.

त्याने तुरंत आपल्या प्रधानाला बोलावून त्या फकिराचा पत्ता शोधून काढून त्याला सन्मानाने आपल्या राज्यात आमंत्रित करण्याचा लखोटा पाठविला. फकिराचे निवासस्थान बरेच दूर असल्याने तो लखोटा पोहोचायला काही महिने लागले. त्यानंतर काही महिन्यांनी त्या फकिराने उत्तर पाठविले. साधारण सहा महिन्यांनी आपण सम्राटाच्या राज्यात येऊ असे आश्वासन दिले. झाले, सम्राट खूष झाला. आपला बाळपणीचा जिवलग मित्र एवध्या मोठ्या पदावर पोहोचून सुद्धा आपल्याला विसरला नाही हे तर समाधान होतेच पण आता तो आपल्याच राज्यात येऊन राज्याचे कल्याण करणार ह्या कल्पनेनेच तो मोहरून गेला. त्याने तयारीला सुरूवात केली. आदेश सुटले कि असे स्वागत ह्या फकिराचे व्हायला हवे जसे कोणाचेच कधीच झाले नाही. रस्त्या–रस्त्यावर साफ–सफाई सुरू झाली. फकिराच्या नजरेला काहीच वाईट पडू नये म्हणून राज्याच्या बाहेरच्या पंचक्रोशीमधील चिखल उपसला गेला. सगळे रस्ते दररोज झाडले जाऊ लागले. पाण्याने स्वच्छ धुतले गेले. रस्त्यांच्या कडेवरची झाडे रंगवली गेली. झाडा–झाडांना मोत्यांची तोरणे लावायला सुरूवात झाले. रस्त्यावर आंथरण्यासाठी मखमली गालीचे मागवले गेले. सहा महिन्यात सगळी तयारी पूर्ण झाली. राज्याचे हेर सम्राटाला येऊन खबर द्यायचे फकिर कोठ पर्यंत पोहोचला. आता एक–दोन दिवसात फकिर येणार अशी वार्ता आली.

आणि तो दिवस उजाडला ज्याची सम्राट आणि संपूर्ण प्रजाच वाट पाहत होती. सम्राट आपल्या महत्वाच्या दरबाऱ्यांसमवेत राज्याच्या वेशीवर उभारलेल्या स्वागत चौकटीच्या कमानीत असलेल्या आपल्या तंबूत बसला होता. सम्राटाचे खबरी तेवढ्यात आले आणि त्यांनी निरोप दिला कि फकिर चालत चालत येत आहे आणि काही मिनिटातच तो वेशीवर पोहोचेल. सम्राट आणि दरबारी मंडळी उठून उभी राहिली. किलकिल्या डोळ्यांनी दूरवर पाहू लागली. आणि अचानक एखाद्या ठिपक्याप्रमाणे फकिराची आकृति दूरून येताना त्यांच्या दृष्टीस पडली. त्यामागे काही साधूंचा जथाही होता. सम्राटाचा उर भरून आला. बाळपणीच्या सगळ्या आठवणी मनात चाळवल्या. आपल्या या बालमित्राच्या स्वागतासाठी राजा सिद्ध झाला. सगळे लक्ष त्या फकिराकडे लागले. दूरचा छोटा ठिपका आता मोठा होऊ लागला. फकिर दृष्टिक्षेपात आला. आणि अचानक सम्राटाला दिसले कि त्या फकिराच्या दोनही पायांना गुडघ्याखाली खूप चिखल लागला आहे. सम्राट खंतावला. आपण तर एवढी काळजी घेतली होती कि पंचक्रोशीत चिखलाचे नामोनिशाणहि नसावे. मग हा आपला

मित्र चिखलात कोठे फसला असेल? त्याला अतीव दु:ख झाले. आणि पहाता पहाता फकीर वेशीवर पोहोचला देखील. सम्राटाने आणि इतर दरबाऱ्यांनी वाकून नमस्कार केला व फकिराचे आशिर्वाद घेतले. सगळे सामोपचार झाले. सम्राटाच्या सांगण्यावरून फकिराने त्याच्या राज्याला आणि सगळ्या प्रजेला आशिर्वाद दिले. भोजन वगैरे झाले आणि त्यानंतर सम्राट व फकिर यांची निवांत वैयक्तीक भेट झाली. आता या सभेत दोघेच होते– सम्राट व फकीर. आता सम्राटाने त्याला सतावणारा प्रश्न विचारलाच. सगळ्या राज्याला मी चिखलापासून दूर ठेवले असताना तुम्हाला कोठली दलदल लागली कि ज्यात तुमच्या पायाला एवढा चिखल लागावा? फकीर खूप खदखदून हसला आणि म्हणाला, “राजन, दोष तुझ्या व्यवस्थेचा नाही. मी कोठल्याही दलदलीत फसलो नाही. परंतु जसे तुझे हेर तुला वारंवार सूचना देत होते ना कि मी कुठवर पोहोचलो आहे तसेच माझेही हेर मला सांगत होते कि तू काय काय तयारी करतोयस माझ्या स्वागताची. मला हे समजले कि तू झाडाझाडावर रत्न–माणकांची तोरणे उभारतो आहेस, रस्त्याच्या कडांना सुगंधी रंग देत आहेस, माझ्या पायवाटेवर उंची गालीचे अंथरत आहेस ज्यांची किंमत प्रचंड आहे इत्यादि. माझ्या लक्षात येत होते कि तू तुझे वैभव मला दाखवून हे सिद्ध करू इच्छितो आहेस कि शाळेत आपण बरोबर होतो पण आयुष्यात तू केवढी प्रगति केली आहेस. तू मला माझ्या दारिद्र्याची, माझ्या साधेपणाची टिंगल उडवत आहेस. मग मी ठरवले कि आपण मुद्दाम पायांना चिखल फासायचा आणि ह्या किंमती गालिचांवरून बेदरकारपणे चालायचे. तुला मला दाखवायचे होते कि तुझ्या वैभवाचे माझ्या खाती काहीच मूल्य नाही. मी ह्या सगळ्या भौतिक सुखांच्या पलिकडे आहे. मी जिंकलो.” सम्राटाने डोळे किलकिले करून फकिराकडे पाह्यले आणि मिश्किलपणे म्हणाला, “अरे, तू काहीच बदलला नाहीस. जसा लहानपणी होतास तसाच राहिला आहेस. तू सगळे त्यागले आहेस पण एक गोष्ट तुला नाही सोडता आली आणि ती म्हणजे तुझा अहंकार. दुसऱ्यापेक्षा आपण श्रेष्ठ आहोत हे तू लहानपणी पण दाखवायचास. आजही दाखवत आहेस. तू जिंकला नाहीस. तुझ्या अहंकाराने तुला जिंकले आहे. त्यापेक्षा मी बरा, माझ्याकडे सोडण्यासारखे बरेच आहे. वैभव, परिवार, सत्ता वगैरे. तुझ्याकडे तर आता तेही नाही. तुझे सोडणे संपले. फकिराने लज्जेने मान खाली घातली व तो पुटपुटला, “खरे आहे रे राजन, माझा अहंकार काही सुटत नाही. खरेच मी आज हरलो.”

तात्पर्य: आयुष्यात बाकी काही सोडले नाही तरीही चालेल. त्या सगळ्या गोष्टी अशाही सुटतील. पण अहंकार मात्र संयमित करणे कठीणच आहे.

आरती रेकि मातेची

जय देवी रेकि माते
शरणागता रक्षिते
तुजला मी प्रार्थिते
जय देवी रेकि माते ॥धृ॥

प्राणरुपे तु राहसी
देही संचार करिसी
हाती प्रचिती दावसी
जय देवी रेकि माते ॥१॥

करूणामय तु अससी
सर्व जीवा आधारिसी
धारामृते शांतविसी
जय देवी रेकि माते ॥२॥

सुख शांती आरोग्याची
आस सायोज्यमुक्तीची
सर्व इच्छा पुरविसी
जय देवी रेकि माते ॥३॥

मीना भावे, वडोदरा

(लेखांक १३)



जाहल्या स्वामीराज वैद्य, व्याधि पळे आपणची

वामनबुवांना व्याधिमुक्त केले..

शके १७९८च्या सुमारास वैशाख शुद्ध चतुर्थीला वामनबुवांची तब्येत खूपच बिघडली. मुत्रामध्ये खडे, कफ, अपचन, शरीर दाह, नेत्ररोग, इत्यादि रोगांनी वामनबुवांना सळो कि पळो करून सोडले. त्यावेळेला वामनबुवा बडोद्यातील सुरसागर तलावाच्या काठाशी असलेल्या घरात राहायचे. त्यांच्या तब्येतीच्या काळजीने त्यांच्या मातोश्री, बंधु वगैरेंना रात्री रात्री झोप लागायची नाही. खूप उपचार केले होते पण आता वामनबुवांच्या जगण्याची खात्री कोणालाच नव्हती. लघुशंका करताना प्राण निघून जातील अशा वेदना त्यांना व्हायच्या. अपचनामुळे पांच पांच मिनिटे शौचाला बसून कुंथावे लागायचे. जीवघेणा खोकला सुरू झाला कि त्याला थांबवता येत नव्हते. संधिवाताने सगळे शरीरच जखडले होते. अशा ह्या दुसःह्य अवस्थेत सुद्धा वामनबुवांची दत्तोपासना थांबली नव्हती एवढे मात्र खरे.

आता जगायची आशाच सुटत चालली होती त्यामुळे वामनबुवा शेवटचा उपाय म्हणून श्री स्वामी समर्थांना अक्कलकोटास एक पत्र लिहिले. उत्तर आलेच तर काहीतरी उपाय मिळेल असे त्यांना वाटले. आता तसाही कोठल्याच औषधाचा उपयोग होत नव्हता. औषधाने तब्येत आणखीच बिघडायची. त्यावेळेला बडोद्याच्या सुलतानपुरा भागात एक राघवेंद्र ब्रह्मचारी नावाचा वैद्य राह्यचा. त्यांचे औषध घेऊनही दोन आठवडे उलटले पण गुण काही येईना. उलट अंगावर लाल चट्टे उमटले. काही वैद्य म्हणाले सोमलरस घ्यायला हवा, काही म्हणाले दानधर्म करा, पूजापाठ करा, जागा बदला, नक्षत्रांची पूजा करा आणि काहीङ्ग खरे म्हणजे प्रारब्धानेच आपण सर्व भोगत असतो हेही वामनबुवांना माहित होते. त्यांनी १०–१२ दिवस अक्कलकोटच्या निरोपाची वाट पाहिली आणि निरोप न आल्याने प्राणायामाच्या साहाय्याने सूरसागरात समाधि घेण्याची योजना बनवली. त्या योजनेप्रमाणे पहाटे ४च्या सुमारास जेव्हा तेथे चिटपाखरूही नसते त्यावेळेला आत्मसमर्पणाला वामनबुवा तलावात उतरले. प्राणायामाला सुरूवात केली आणि तेवढयात तो दीनदयाळु अक्कलकोटनिवासी सदगुरू भक्तवत्सल यतिराज श्री स्वामी समर्थ प्रत्यक्षात तेथे अवतरला. त्यांनी वामनबुवांना हाताला धरून पाण्याबाहेर खेचले व किनाऱ्यावर आल्यावर अतिशय रागाने एक जोरदार थप्पड लगावली. स्वामीराज त्यांना ओरडुनच म्हणाले, “मूर्खा, गधडया, मुकाटपणे बैस. जोपर्यंत तुझे भोग भोगून होत नाहीत तोपर्यंत तुला गति नाही. आमचा पण राग करत आहेस का रे? तुला सहज समाधि शिकवली असताना जलसमाधि का घ्यायला निघालास?” हे सांगून स्वामी त्यांना घरी घेऊन गेले व त्यांच्या ह्रदयस्थानावर हात फिरवून म्हणाले, “सगळे ठिक होईल. आरामात बैस. धावपळ करू नकोस. नाहीतर आसूड खाशील. हे बोलता बोलता करूणानिधी, राजाधिराज भक्तराज, कल्पद्रूम, योगेश्वर, त्रिभुवनानंद, अद्वैत, अभेद, परिपूर्ण ब्रह्म श्री स्वामी समर्थ महाराज गायब झाले. त्यावेळी वामनबुवांच्या मातोश्रींना आणि भावाला विनासायास स्वामींचे दर्शन झाले. त्यावेळचा त्या दोघांचा आनंद केवढा असेल?

दत्तात्रेय स्वामी महाराजांचा अभयकर हस्ताचा शरीराला स्पर्श झाल्यावर आणखी काय हवे? गेले काही आठवडे झोप न आलेल्या माझ्या शरीराला त्या रात्री गाढ झोप लागली. प्रातःकाळी जाग आल्यावर शरीर एकदम स्वस्थ आणि मन प्रफुल्लित झाले. बऱ्याच विकारांचा त्या दिवशी अंत झाला. सकाळी दहा वाजता अक्कलकोटावरून प्रसादासहित पत्र आले. हे सगळे पाहून आणि ऐकून इतर लोकांना किती आनंद झाला त्याचे वर्णन काय आणि किती करू असे वामनबुवांना झाले. त्यानंतर अक्कलकोटचे दाजीसाहेब भोसले सतारीवर स्वामींची भजने गाऊन गेले. रामभाऊ बापटांच्या आग्रहाने मग नेमिचंद वैद्याचे औषध घेतले आणि तब्येत सुधारायला लागली. परंतु हातापायांचे सांधे मात्र दुखतच होते. स्वामींचा संकेत त्यांना मिळाला कि एकदा का अक्कलकोटला आलास कि पूर्ण बरा होशील. ताबडतोब ते रेल्वेने अक्कलकोटला गेले व जोशीबुवांच्या घरी उतरले. स्वामी त्यावेळी मैंदर्गीला होते. तेथे जाणे अशा परिस्थितीत अशक्य होते वामनबुवांना. मग तेथेच समाराधनेमध्ये ते जेवायचे. दत्त जयंतीच्या दिवशी मग स्वामी मठात आले आणि पलंगावर पहुडले होते. वामनबुवा हळूहळू खांबांना पकडून स्वामींकडे जायला निघाले. स्वामी महाराजांनी त्यांना पाह्यले आणि मोठ्याने म्हणाले, “काय रे बुवा? तूच तो सूरसागरात जीव देत होतास ना? तुझा सूरसागर सुकला होता ना रे?” एवढे बोलून स्वामी जोराजोराने हसले.

स्वामी म्हणाले, “तुझ्या बापाच्या श्राद्धात कमी खा पण आज मात्र अगदी पोटभर जेव.” एवढे म्हणून स्वामींनी त्यांना आग्रह करून पक्वान्ने खिलवली. चार–पाच दिवसांतच वामनबुवा संधिवातापासून पूर्ण मुक्त झाले आणि ‘श्री गुरूदेव दत्त’चा गजर अक्कलकोटात दुमदुमला.

(संदर्भ: अक्कलकोटनिवासी स्वामी समर्थ महाराज चरित्र, लेखक: कै गणेश बल्लाळ मुळेकर)

स्वामी विवेकानंद आणि ध्यान

लेखांक ७ वा

लेखकः श्री प्रांजल जोशी, पुणे

ध्यानाच्या तीन अवस्था

ध्यानाच्या तीन अवस्था किंवा तीन टप्पे आहेत. पहिली अवस्था म्हणजे – धारणा, यामध्ये माझे सर्व लक्ष मी एकाच गोष्टीवर केंद्रित करतो.

असे समजा कि इथे एक काचेचा पेला (ग्लास) आहे. मी माझे संपूर्ण लक्ष (वा ध्यान) इतर सर्वकाही वगळून फक्त त्या पेल्यावर केंद्रित करणे, म्हणजे धारणा.

परंतु चित्त (वा मन) अतिशय चंचल आहे, ते इतरत्र भटकते. जेव्हा ते निश्चल बनून इतरत्र भटकण्याचे थांबवते, ती अवस्था म्हणजे ध्यान.

पण याही पलीकडे एक सर्वोच्च अवस्था आहे – जेव्हा मी आणि तो पेला यामधील भेदाभेद (फरक) हरवून जातो, संपून जातो, नाहीसा होतो.

चित्त (वा मन) अन पेला एकच बनून जातो, ती तंद्री म्हणजेच समाधी ! मला फरक दिसतच नाही, जाणवतच नाही.

सर्व जाणीवा थांबतात आणि विविध इंद्रियांद्वारे कार्यरत असणारी शक्ती मनामध्ये एकवटते (केंद्रित) होते.

मग हा काचेचा पेला (ग्लास) संपूर्णपणे मनाच्या प्रभावाखाली असतो.

या धानाच्या अवस्थांचा अनुभव घेतला पाहिजे. हा लोकविलक्षण खेळ योगी लोक खेळतात (अनुभवतात).

परिपूर्ण विश्रांती कशी घ्यावी?

ध्यान म्हणजे मन स्वत:कडेच वळवणे आहे. (बाह्यकेंद्री ऐवजी आत्मकेंद्री करणे)

मन सर्व विचार-लहरी थांबवते आणि आजूबाजूचे जग देखील थांबते.

आपली चेतना (किंवा जाण) विस्तारते. प्रत्येक वेळी तुम्ही ध्यान कराल, तशी तुमची प्रगती होत राहील.

जेवढे अधिकाधीक सातत्य, तेवढे ध्यान होईल, आपोआप येईल. तुम्हाला शरिरभाव जाणवणार देखील नाही.

जेव्हा तासाभराने तुम्ही ध्यानातून बाहेर याल, तेव्हा आयुष्यातील सर्वात सुंदर विश्रांती तुम्ही तुमच्या शरिराला दिलेली असेल.

हाच एकमेव प्रभावी मार्ग आहे, ज्याने तुम्ही तुमच्या संपूर्ण शरिराला विश्रांती देऊ शकता.

अशी विश्रांती, जी गाढ झोप घेऊन सुध्दा मिळू शकत नाही.

कारण माणसाचे मन अगदी गाढ झोपेत सुध्दा, सातत्याने भरकटत, उडया मारत असते.

बस्स ! ध्यानावस्थेतले ते काही क्षण, जेव्हा तुमचा मेंदू देखील जणू बंद (स्तंभित) झालेला असतो.

फक्त काहीशी जुजबी अशी जाणीव (चेतना वा जीवनशक्ती) कार्यरत असते. तुम्ही शरिराला विसरून जाता.

अशी अवस्था की ज्यात तुमच्या शरिराचे तुकडे तुकडे केले तरी तुम्हाला समजणार देखील नाही.

परमोच्च अशा आनंदांचा तुम्ही अनुभवू करता. तुम्ही अतिशय हलके होता.

हीच ती परिपूर्ण विश्रांती जी ध्यानावस्थेत आपल्याला मिळते, मिळू शकते.

क्रिया प्रतिक्रियेला जन्म देते

निसर्गातील प्रत्येक घटनेत आपण कमीतकमी निम्मे योगदान देतो. निम्मे आपले अन निम्मे निसर्गाचे !

जर आपण आपला अर्धा भाग काढून टाकला तर, ती गोष्ट (घटना) तिथेच थांबते. थांबलीच, संपलीच पाहिजे.

प्रत्येक क्रियेची समान प्रतिक्रिया असते. जसे एखाद्या माणसाने माझ्यावर आघात केला आणि मला जखमी केले, तर ती त्या माणसाची क्रिया आणि माझ्या शरिराची प्रतिक्रिया आहे.

दुसरे उदाहरण घेऊ. समजा तुम्ही एखाद्या तलावात दगड टाकत आहात.

तुम्ही टाकत असलेल्या प्रत्येक दगडाची तलावाच्या पृष्ठभागावर तरंगांद्वारे प्रतिक्रिया उमटतेच.

अगदी याचप्रमाणे बाह्य गोष्टीही त्या दगडांसारख्या मनाच्या सरोवरात पडतात.

फक्त आपण तो दगड पहात नाही, पण त्यामुळे उठलेल्या लहरी मात्र पाहतो (अनुभवतो).

क्रमश:

रेकिब्रम्ह मासिकासाठी
WhatsApp Group

ज्या साधकांना रेकि ब्रम्ह मराठी मासिक
WhatsApp वर वाचायची इच्छा आहे,
त्यांच्यासाठी एक **WhatsApp Group** बनविण्यात आला आहे.

दर महिन्याचा अंक तेथे पोस्ट केला जाईल.

तुम्ही रेकिब्रम्ह मराठी मासिकाचे वर्गणीदार असाल आणि अंक
WhatsApp वर वाचायला इच्छुक असाल, तर हा ग्रुप जॉईन करावा:

https://chat.whatsapp.com/If3WHw9nHAc2J3rY8jGSvY

अष्टावक्र गीता

अजित सर

रेकिब्रह्माच्या वाचकांना साधनेमधील चांगल्या चांगल्या साहित्याचा लाभ मिळावा हा ह्या मासिकाच्या संपादकीय मंडळाचा नेहमीच प्रयत्न असतो. वाचकांनीही ह्या गोष्टीचा नेहमीच कौतुकाने स्वीकार केला आहे ही बाब सुद्धा आमचा उत्साह वाढविते. या अंकापासून अष्टावक्र गीता या विषयावर सार्थ विवेचन प्रस्तुत करण्याचा आमचा मानस आहे. त्यातील हा पहिला लेखांक.

अष्टावक्र गीता हा भारतीय अध्यात्माचा शिरोमणि म्हटला तर त्याला कोणाची अडचण नसावी. हा एक असा अपूर्व ग्रंथ आहे कि ज्या ग्रंथाशी इतर कोठल्याच ग्रंथाशी तुलना करता येत नाही, इतका हा अवर्णनीय आणि अतुल्य असा ग्रंथ आहे. आत्म ज्ञान प्राप्तिच्या बऱ्याच प्रक्रिया आहेत. ज्ञान आहे, कर्म आहे, भक्ती आहे, योग आहे, प्रार्थना आहेत, ध्याने आहेत ज्या सर्वांतून माणसाला आत्मस्वरूपाचा बोध होऊ शकतो. भिन्न भिन्न धर्मांतून भिन्न भिन्न प्रक्रिया शिकवल्या जातात हेही सत्य आहे. परंतु अष्टावक्र गीता कोठल्याही प्रक्रियेचा आधार घेतल्याशिवाय सरळ अज्ञानाचाच नाश करते. आणि हेच ह्या दिव्य ग्रंथाचे वेगळेपण आहे. अष्टावक्र मानतात कि कोठल्याही विधीची, प्रक्रियेची गरज साधकाला नाही. पूजा, प्रार्थना, भजन–किर्तन, हठयोग इत्यादि क्रिया साधकाला फक्त भटकवतात आणि त्याच्या अंतिम लक्ष्याला बाधा पोहोचवतात. क्रिया आणि त्यातील प्राविण्य फक्त साधकाच्या अहंकाराला वाढवतात. ह्या सगळ्या क्रिया म्हणजे साधनेतील अवडंबरे आहेत. या सर्वांतून साधकाला काहीतरी केल्याचे समाधान जरी मिळाले तरी ह्या देखाव्याने प्रत्यक्ष अंतिम अनुभवातून तो वंचित राहतो. अंधकाराला दूर करायची प्रक्रिया करण्यापेक्षा एक दिवा लावावा जेणेकरून अंधाराच्या अस्तित्वच समाप्त होऊन जाईल. हा दिवा लागेल ज्यावेळेला साधकाला बोध होईल. आत्मबोधासाठी कोठलीही प्रक्रिया कामी येणार नाही असे अष्टावक्रांचे ठाम मत होते. आत्मा कोठे हरवला नाही कि ज्याला शोधल्याने तो मिळेल. फक्त त्याचे अस्तित्व आपल्या अज्ञानाने झाकोळले आहे. तो अज्ञानाचा झाकोळ गेला कि मग फक्त आत्म्याचेच अस्तित्व आहे. मग त्याचीच अमर्याद सत्ता आहे. फक्त एका क्षणाचा तो खेळ आहे. त्यासाठी वर्षानुवर्षे काही साधना करायची जरूर नाही असे अष्टावक्र गीता सांगते.

दुर्दैवाने सामान्य मनाला हे कळतच नाही. मनाला प्रक्रिया आवडतात, भावतात. कारण प्रक्रिया मर्यादित असतात. त्यांना सुरूवात असते आणि त्यांना शेवटही असतो. मानवी मनाला अशा मर्यादित गोष्टीच फार आवडतात. परंतु मर्यादित गोष्टी अमर्याद अशा आत्मस्वरूपाला कशा पोहोचवणार? आणि अष्टावक्रांच्या गीतोपदेशाचा हाच तर गाभा आहे. बरे, अष्टावक्र गीतेतील ही केवळ संकल्पना नाही. तो प्रत्यक्ष प्रयोग आहे. ते केवळ सैद्धान्तिक वक्तव्य नाही तर प्रयोग–सिद्ध वैज्ञानिक सत्य आहे. ती काही राजाने प्रजेला दिलेली आश्वासने नाहीत किंवा एखाद्या ज्योतिषाने वक्तवलेले भविष्य नाही. राजा जनकावर प्रयोग करून अष्टावक्रांनी हा प्रयोग सिद्द करून दाखवला आहे.

अध्यात्म जगामध्ये तीन तत्वे महत्वाची मानली जातात, ती म्हणजे – ज्ञान, भक्ती आणि कर्म. आणि मनुष्याची दोन व्यक्तित्व आहेत – अंतर्मुखी आणि बहिर्मुखी. बहिर्मुखी माणसांसाठी कर्म आणि भक्ती मार्ग अनुकुल असतात तर अंतर्मुखीसाठी ध्यान. बहिर्मुखी मनुष्याला ज्ञान किंवा बोध मार्ग समजत नाही. त्यासाठी विद्वान, प्रज्ञावान, प्रखर बुद्धी आणि चैतन्याचा अधिकारी माणूसच लागतो. म्हणून अष्टावक्रांचा हा

मार्ग जनसामान्यांपर्यंत पोहोचलाच नाही. अष्टावक्रांचा मार्गच सांख्यांचा आहे. ज्याच्यात करायचे काहीच नाही. मी म्हणजे शरीर नाही, मन नाही, मी म्हणजे केवळ तो अमर्याद आत्मा इत्यादि ज्याने जाणले त्याचा मोक्ष झालाच की. मोक्ष म्हणजे काही स्थान नाही कि जिथे जावे. तो तर एक अनुभव आहे. भगवान कृष्णांची भगवद गीता ही सामान्यतः सांसारिक व्यक्तींसाठी आहे. त्या गीतेत ज्ञान, भक्ती, कर्म सगळे काही आहे, परंतु सर्वात जास्त भर आहे कर्मावर. मला हा प्रश्न बालपणापासून पडत आला आहे कि भगवान कृष्णांनी गीता अर्जुनालाच का ऐकवली? पांडवांमध्ये सर्वात श्रेष्ठ आणि सात्विक होता तो युधिष्टीर, धर्मराज. गीतेवर तसे पाहिले तर अधिकार त्याचा होता. बरे तो नव्हे तर कमीत कमी भीमाला तरी गीतेची प्राप्ति आवश्यक होती जर गीता ही लढाई जिंकण्यासाठी होती. कारण तो सर्वात बलवान होता, पांडवांचा सेनापती होता. परंतु परमेश्वरांनी त्यालाही ती नाकारली. नकुल, सहदेव सारख्या तुलनेने दुर्बळ पांडवांना गीता सबळतेसाठी आवश्यक होती. परंतु गीताप्राप्तिपासून तेही वंचित राहिले. मिळाली ती अर्जुनाला, जो मधला होता, मध्यम मार्गीय होता, एखादा सांसारिक माणुस असावा तसा होता. धर्म, भीम पूर्ण जागृत होते त्यांना जागवण्यात काहीच अर्थ नव्हता. नकुल, सहदेव आपल्या मोठया भावांच्या शरणागतित होते, ते निश्चिंत होते, ते बेशुद्ध होते. असा एकच होता जो धड जागा नव्हता, ना झोपलेला. केवळ तळमळणारा आणि तो म्हणजे अर्जुन. गीतेने सांसारिकतेला जागवले. कर्म बंधनांची आणि कर्तव्यांची जाण करून दिली. अष्टावक्र गीता साधु संन्यासांसाठी आहे. ती केवळ मुमुक्षुंसाठी आहे. अष्टावक्र कृष्णासारख्या वेगवेगळ्या प्रक्रिया नाही सांगत, ते फक्त एकच बोधाचा मार्ग सांगतात जो अनोळखी आहे, भावातीत आहे, समय, काळ, देश आणि काळाच्या पलिकडे पण पूर्ण वैज्ञानिक आहे. अष्टावक्र गीता समजण्यासाठी नाही तर ती पचवण्यासाठी आहे. जो ह्या गीतेला समजायला जाईल तो चुकेल. एखाद्या समुद्राला चमच्यानी मोजण्यासारखी चूक होईल ती!

अष्टावक्र गीता समजून घेण्याआधी हे जाणुन घेणे आवश्यक आहे कि अष्टावक्र कोण होते. त्यांच्या जीवनाच्या बाबतीत तीन कथा जास्त प्रचलित आहेत. ह्या कथांवरून समजून येते कि अष्टावक्र ज्ञानियांचा राजा होते. अगदी लहान वयातच त्यांना ज्ञान प्राप्ति झाली. अशी एक कथा आहे कि ते जन्मतःच शरीराने अष्टावक्र व कुरूप होते. असे म्हटले जाते ते आईच्या पोटात असताना त्यांचे वडील देव पाठ करत होते तेव्हा गर्भामधूनच त्यांनी आपल्या वडीलांची चूक काढली. त्यांनी म्हटले, "थांबा. शास्त्रामध्ये ज्ञान कोठे आहे? ज्ञान तर आपल्या आतच असते. सत्य शास्त्रांत कोठे आहे? ते तर आपल्याला आंतरिकच असते." त्याच्या वडीलांचा अहंकार जागृत झाला आणि त्यांनी आपल्याच त्या गर्भस्थ बालकाला शाप दिला कि तू जन्मतःच अष्टांग वक्र होशील. आणि तसेच झाले. म्हणून त्या बालकाचे नाव अष्टावक्र झाले.

अष्टावक्रच्या बाबतीत आणखी एक गोष्ट सांगितली जाते कि तो बारा वर्षांचा झाला त्यावेळेला जनक राजाने मोठमोठ्या विद्वानांना बोलावून एक सभा आयोजली होती. त्या सभेत तत्वज्ञान आणि शास्त्रार्थ या विषयांवर गहन चर्चा होणार होती. या सभेत जो जिंकेल त्याला सोन्याने मढवलेली शिंगे असणाऱ्या १०० गाई बहाल केल्या जाणार होत्या. सायंकाळी अष्टावक्रांच्या कानावर आले कि त्याचे वडील बाकी साऱ्या विद्वानांशी लढून जिंकले होते पण एका विद्वानाकडून ते हरत आहेत. हे ऐकून ते सभेत प्रवेश करते झाले. त्यांचे ते वेडे वाकडे रूप पाहून सभेत हशा पिकला. थोडावेळ थांबून मग अष्टावक्र पण जोरजोराने हसायला लागले. जनक राजाने त्यांना थांबवून विचारले, "संपूर्ण सभा तुला बघून का हसायला लागली हे मला समजले, परंतु तू आता का हासलास हे नाही समजले." अष्टावक्र म्हणाले, "येथे या चर्मकारांच्या सभेत सत्याचा निर्णय होत आहे. हे सारे चर्मकार या सभेत काय करत आहेत?" साऱ्या सभेत स्तब्धता पसरली. सगळ्याच विद्वानांना राग आला होता. जनक राजाने ते ओळखले व वातावरण नियमित करण्याच्या हेतूने विचारले. "तुझ्या शब्दांचा अर्थ नाही समजला." अष्टावक्र शांतपणे म्हणाले, "एकदम सरळ आहे अर्थ. चर्मकार चामडयाचे पारखी असतात. त्यांना ज्ञानाचे काय देणे घेणे? ज्ञान्याला ज्ञानाची ओळख पटते. चामडीची नाही. यांना माझी चामडीच दिसली. म्हणून ते ज्ञानी नाही होऊ शकत. ते च्रर्मकारच आहेत. राजन जसे मंदिर वेडे वाकडे झाले म्हणून आकाश वेडेवाकडे नाही होऊ शकत. मंदिराच्या आकारावर आकाशाचा आकार ठरविला नाही जात. कारण मंदिर सावयव आहे तर आकाश निरवयव. तसेच कोणाचे शरीर पाहून त्याच्या आत्म्याचे मोजमाप नाही करता येत. ज्ञान्याला आत्मदृष्टी असते त्यातून तो फक्त आत्म्याला पाहतो. अज्ञान्याला चर्म–दृष्टी असते. तो फक्त चामडी जाणू शकतो." अष्टावक्रच्या या भाषणावर राजा जनक प्रभावित झाला. त्याने त्या छोटया बालकाच्या चरणांवर लोळण घेतली. त्यांना सिंहासनस्थ केले आणि अष्टावक्राचे शिष्यत्व पत्करले. त्यातूनच अष्टावक्र गीतेचा जन्म झाला.

DSPPL तर्फे शिक्षकदिन कार्यक्रमाचे ऑनलाईन आयोजन

शिक्षक दिनानिमित्त DSPPL तर्फे विशेष ऑनलाईन कार्यक्रम सादर करण्यात आला होता. DSPPLच्या विविध शिबिरामध्ये सहभागी झालेल्या मुलांनी आणि युवकांनीच हा कार्यक्रम सादर केला. शिक्षकांचे महत्व, त्यांनी दिलेल्या शिकवणीचा दैनंदिन जीवनातील उपयोग आदी विषयांवर युवकांनी त्यांचे मनोगत व्यक्त केले. DSPPLच्या शिबीरामुळे त्यांच्यात झालेला सकारात्मक बदल आणि शिबीरात शिकवलेल्या विविध मार्गदर्शक तत्वांचे अमूल्य महत्व यांचे वर्णन या युवकांकडून ऐकताना सर्वच DSPPL शिक्षकांना अतिशय आनंद झाला, जणू आपल्या कार्याची पावतीच मिळाली असे वाटले.

अजित सरांनीही ह्या प्रसंगी शिक्षक आणि गुरु यातील मूलभूत फरक समजावून सांगितला. आपल्या संस्कृतीमध्ये शिक्षक ऐवजी आचार्य हा शब्दप्रयोग आहे असे गुरुजी म्हणाले. "आचरणात बदल घडवतो तो आचार्य, सदाचारी बनवितो तो आचार्य!" गुरुजींच्या या विवेचनामुळे DSPPLच्या सर्व शिक्षकांमध्ये देखील एक विचारमंथन सुरु झाले.

गणपती उत्सवा निमित्त DSPPL तर्फे निंबध स्पर्धा (विषय: गणपती – एक अलौकिक देवता), वक्तृत्व स्पर्धा (विषय: मला समजलेली गणपती देवता) तसेच चित्रकला स्पर्धा (विषय – माझ्या कल्पनेतील गणेश स्वरूप) अशा विविध स्पर्धा ऑगस्ट महीन्याच्या अखेरीस घेण्यात आल्या होत्या. त्या स्पर्धांचा निकालही ह्या कार्यक्रमात जाहीर करून गुरुंजीनी सर्वांचे कौतुक केले.

आश्रम वार्ता

रेकी शिबिरांचे अनोखे योगदान

सद्य परिस्थितीत स्वत:ला सांभाळणे हेच महत्वाचे आहे. आणि ह्या परिस्थितीत रेकि जे योगदान देत आहे ते आपण सर्व अनुभवत आहोत. हाच लाभ जास्तीत जास्त लोकांना मिळावा म्हणून सामाजिक सुरक्षिततेचे सर्व नियम पाळून रेकि शिबिरांची सुरुवात झाली आहे. गेल्या महीन्यातही आपल्या वेगवेगळ्या केद्रांमध्ये रेकि शिबीरे आयोजित केली गेली.

रेकि विद्या निकेतनने पुढाकार घेऊन ठाण्याचे रेकि नियोजक गिरिश कर्णिक यांच्या नेत्रृत्वाखाली सोसायटीच्या सुरक्षा दलासाठी प्रथम श्रेणीचे शिबीर आयोजीत केले. १२ जणांनी ह्या शिबीराचा लाभ घेतला. हे शिबीर सोसायटीच्या लॉबीमध्ये सकाळी साडे तीन तास आणि संध्याकाळी साडेतीन तास अशा दोन बॅचमध्ये, २१ ते २४ संप्टेंबर या कालावधीत, रेकि मास्टर राकेश कुमार आणि जयराम आठलेकर यांनी घेतले. हा एक अनोखा प्रयोग होता, जो या साथीच्या रोगाला गेट बाहेर ठेवण्यासाठी सुरक्षा दलाचे एक संरक्षक कवच तयार करेल. यावरून निश्चितच अनेक सोसायटी प्रेरणा घेऊ शकतात.

ह्यात आणखी विशेष म्हणजे रेकि विद्या निकेतनच्या नवीन घोषित झालेल्या, अमेरीकेतील रेकि शिक्षिका नादिया, यांचे प्रशिक्षण या लॉकडाऊन काळात संपन्न झाले. जवळ जवळ दीड महीना हे प्रशिक्षण ऑनलाईन चालू होते. गुरुजींच्या मार्गदर्शनाखाली ते यशस्वीरीत्या पूर्ण झाले. अमेरिकेतील शिकागो येथे २६ व २७ संप्टेंबर रोजी नादिया यांनी प्रथम श्रेणी रेकि शिबिर घेऊन तेथील केंद्राच्या शिबिरांची सुरुवात केली.

आश्रम स्पंदन..

गुरुजींशी झालेल्या एका चर्चासत्रात त्यांनी संस्कारांचे (छाप व ठसे) तीन प्रकार सांगितले. मल, विक्षेप आणि आवरण. मल असते चिखलासारखे सहजतेने साफ होऊ शकणारे, विक्षेप हे स्वतःच्या मूळ स्वभावाचे अज्ञान–विटेसारखे, आणि आवरण हे संपूर्ण अज्ञान ट्र एका दगडासारखे, ज्याला तोडणे कठीण. या तीन थरांनी वेढला गेला असल्याने आत्मा आपल्या मूळ उगमाकडे जाऊ शकत नाही व त्याला परत जन्म घ्यावा लागतो. आणि जोपर्यंत आपण हे संस्कारांचे थर पूर्णपणे साफ करत नाही तोपर्यंत आपण जन्म–मृत्यूच्या फेऱ्यात अडकून पडतो.

सर्वात कठीण थर आहे 'आवरण' जे दुसरे काही नसून आपला मूळ गुणधर्म, आपली प्रवृत्ती आहे. जरी संस्कारांचे तीन प्रकार म्हटले गेले आहेत तरी हे थर शेवटी आवरणाशी जोडले आहेत, म्हणजेच कृष्ण–विवराशी. सर्वात महत्वाचे आहे संस्काराच्या आवरणापर्यंत पोहचून त्याला साफ करणे. एकदा का साधक या स्थरापर्यंत पोहचला की त्याच्या मुक्तीच्या प्रवासाची सुरुवात झाली म्हणून समजावे.

आवरणात असताना त्याच्या पुढच्या, विक्षेप (अज्ञान) या आवरणाबद्दल आपल्याला जाण नसते. अज्ञान म्हणजे माहीत नसणे असे नाही पण एखादी गोष्ट आहे, पण त्याचा अनुभव न घेणं. खरंतर एखादी गोष्ट मुळात नाही तर त्याला नाकारताही येत नाही. आवरणात तर एखाद्या गोष्टीच्या असण्याचेही भान नसते. आत्म्याच्या अस्तीत्वाचीही जाणीव नसते. ही अवस्था पूर्णपणे प्रकाशाच्या अभावाची आहे. त्यात प्रकाशाचा एखादा कीरणही नाही आहे. जेव्हा तुम्ही पूर्ण अंधःकारात असता तेव्हा द्वैतता नसते. प्रकाशाची कल्पनाच नाहीशी होते.

गुरुजी असेही म्हणाले की जेव्हा संस्कार निघू लागतात तेव्हा सर्वप्रथम आवरण गळून पडते. जेव्हा आवरण असते तेव्हा परमेश्वराचा विचारही येत नाही. अज्ञान असल्याने ज्यात आनंद मिळत असतो तेच आपण करत राहतो. परीणामांची ही जाणीव आपल्याला नसते.

डेव्हीड हॉकींग्स ('पॉवर वर्सेस फोर्स' या पुस्तकाचे लेखक) यांच्या मते अशी लोक ज्यांची चैतन्याची पातळी २००च्या खाली असते ती लोक संपूर्णपणे आवरणानी वेढलेली असतात. ही लोक स्वतःच्या चांगुलपणाचा कधीच अनुभव घेत नाहीत तर सतत द्वेष, अपराधीपणा, गर्व, लज्जा, सूड, भिती, राग आणि उदासीनता ह्याचा अनुभव करत असतात. ह्या आवरणाच्या थराला काढणे कठीण असते. पण जेव्हा हे आवरण निघून जाते तेव्हा त्यांच्या चेतनेची पातळी २०० ह्या मात्रेच्या वर सरकते आणि ही लोक स्वतःतील दिव्यत्वाचा अनुभव घेऊ लागतात. अशी लोक खुल्या मनाची, शांतीप्रिय, प्रेमळ, हुशार, प्रेणादायक, आनंदी, स्थिर, आणि नविन गोष्ट शिकण्यास तयार अशी असतात.

पण कधी कधी ही सुध्दा चिडचीडी व दुःखी होतात, जेव्हा त्यांना संस्कारांचे काळे ढग वेढतात आणि मग ते त्यांचा मूळ स्वभाव विसरतात. संस्कारांचा हा खेळ सुरुच राहतो जोपर्यंत साधकाची चैतन्याची अवस्था ६००च्या वर जात नाही. थोडक्यात विक्षेप या पातळीच्या बाहेर जात नाही. या अवस्थेत साधक शुध्द असून परमानंदाचा अनुभव घेत असतो, आत्मसाक्षात्काराच्या जवळ असतो. तो सर्वांमधील दिव्यत्व पाहू शकतो. त्याचे संस्कार मल स्वरुपातील मातीसारखे असतात जे सहज साफ केले जाऊ शकतात. ते लहान मुलांसारखे निष्पाप आणि प्रसन्न बनतात.

थोडक्यात ह्या संस्कारांना साफ करण्याच्या प्रवासामधे आपण आवरणापासून मलाकडे आणि मलाकडून आत्मसाक्षात्काराच्या माळेकडे जात असतो.

॥ ॐ श्री स्वामी समर्थ ॥

प्रिय साधक,
जय गुरूदेव

करोना व्हायरसने जी भयानक परिस्थिति तयार केली आहे त्याला तोंड देण्यासाठी श्री स्वामी समर्थांच्या प्रेरणेने अमेरिकेतील एक परम स्वामीभक्त डॉ. मुकुंद हनुमंते यांना स्वामींकडून एक स्वामी उपासनेचा मार्ग मिळाला तो त्यांनी आपल्या अजित सरांना पाठवला तो आपल्या साधकांसाठी येथे देत आहोत जेणेकरून आपल्या साधक-वाचकांनाही एक छान मार्ग मिळेल.

संपादक मंडळ

उपासनेचा क्रम असा असावा

१. ३ दीर्घ **ॐ**कारांनी सुरूवात करावी.

२. **श्री गुरू यतिवर..** हे बाजुला दिलेले स्तवन प्रेमभावाने करून स्वामींना आवाहन करावे.

३. **श्री दुर्गा सप्तश्लोकातील** खाली दिलेल्या **६व्या श्लोकाचे २१ वेळा** उच्चारण करावे.

४. महामृत्युंजय मंत्राचे (**त्र्यंबकैं** असा उच्चार करावा- त्र्यंबकं असा नव्हे) **१०८ वेळा** उच्चारण करावे

५. **'ॐ श्री भक्तसंरक्षणाय नम:'** या मंत्राचा **२१ वेळा** उच्चार करावा.

६. २ मिनिटांचे ध्यान करून **श्री स्वामी समर्थांना प्रेम, प्रकाश व कृतज्ञता अर्पण करावीत.**

श्री दुर्गा सप्तश्लोकीचा ६वा श्लोक

रोगानशेषानपहंसि तुष्टा
रुष्टा तु कामान् सकलानभीष्टान् ।
त्वामाश्रितानां न विपन्नराणां
त्वामाश्रिता ह्याश्रयतां प्रयान्ति ॥

जेव्हा तू प्रसन्न असतेस तेव्हा तू रोगांचा आणि विकारांचा विमोड करतेस. आणि जेव्हा तू रागावतेस तेव्हा तू सर्व आशा-आकांक्षांचा विनाश करतेस. जो तुला शरण आला त्याला कोठल्याही संकटाला सामोरे जावे लागतच नाही. आणि जे तुझ्यात समर्पित होतात ते तर इतरांना सहारा देतात.

https://www.youtube.com/watch?v=AG-AU3t87uw
(६व्या श्लोकाची सुरवात 2.25 min पासून ते 2.40 min पर्यंत)

महा मृत्युंजय मंत्र

ॐ त्रयंबकै यजामहे सुगन्धिं पुष्टिवर्धनं ।
उर्वारुकमिव बन्धनान् मृत्योर्मुक्षीय मा ऽमृतांत्

॥ ॐ श्री भक्तसंरक्षकाय नम: ॥

||श्री गुरू यतिवर स्तवन||

श्री गुरू यतिवर भवभय दुस्तर
निस्तर सत्वर श्री स्वामी ।
भक्त कृपाकर ध्यान रुचिर सूरवन्द्य
पदांबुज प्रणतो मी ||१||
ब्रह्मा विष्णू शिव गणपतीही
अंबा दुर्गा तू स्वामी ।
श्रीपाद श्रीवल्लभ नरहरी
दत्त तुझी रुपें नामी ||२||
भक्त रक्षका नमो नमस्ते
राहो प्रीति तव नामी ।
श्री स्वामी श्री स्वामी जपा हो
हेच निधानी ये कामी ||३||
राम कृष्ण अवतार तुझेचि
झाले सदया जाणे मी
पुराण पुरुषा मनुज मानिती
तुझ जे गढले गाढ तमी ||४||
परब्रह्म साक्षात श्रीगुरू
श्रुति यापरी बोले निगमी|
कल्पवृक्ष श्री अक्कलकोटी
स्वामी विराजे मठ धामी ||५||
भाग्यवान तो घडले ज्याते
स्वामी दर्शन सप्रेमे |
अलभ्य लाभ तोचि लाधला
स्वामी भजन जो करी नेमें || ६||
धर्मसार हे तत्व मान वा
जतन करी तू निष्कामें |
दासगणेशा आस स्वामींची
त्याविण न दुजे काही गमे ||7||

https://www.youtube.com/watch?v=fwuF6TUibXc